तातडीचे

# *जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय*

११७, बीडीडी चाळ समोर, डॉ. आंबेडकर वसतीगृहांच्या आवारात, वरळी, मुंबई - १८
☎/ फॅक्स क्र. ०२२ -२४९२२४८४ ई-मेल - dwcdmcity@yahoo.com

*********************************************************

जा.क्र.- जिमबाविअमुंश/काठिमहोलैछसंअधि-१३/अंतस/२०१९-२०२०/ 1610 दि.- २३/०३/२०१७

**प्रति,**
सर्व कार्यालय प्रमुख,
शासकीय/निमशासकीय/खाजगी क्षेत्र,
इन्टरप्राइजेस, सहकारी संस्था, क्रिडा संकुले,
प्रेक्षागृहे, मॉल्स्, अशासकीय संघटना, ट्रस्ट,
रुग्णालये, सुश्रुषालये, क्रिडा संस्था, वाणिज्य,
शैक्षणिक, औदयोगिक कार्यालय, मुंबई शहर.

**विषय:- कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ व नियम दि. ०९/१२/२०१३ अन्वये अंतर्गत समिती गठीत करण्याबाबत.**

---

**संदर्भ:-** १. कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळांस (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम, २०१३
२. शासन निर्णय क्र. मकचौ-२०१३/प्र.क्र.६३/मकक दि. १९ जून २०१४

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये सविनय सादर करण्यात येते कि, कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ व नियम दिनांक ०९/१२/२०१३ प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत. या अधिनियमातील कलम ४ (१) अंतर्गत तक्रार समिती गठीत करण्याची तरतूद आहे. या अधिनियमाच्या प्रकरण १ मधील कलम २ मध्ये नमूद व्याख्येनुसार प्रत्येक शासकीय/निमशासकीय कार्यालय, संघटना, महामंडळे, आस्थापना, संस्था शाखा, तसेच खाजगी क्षेत्र, संघटना किंवा खाजगी उपक्रम/संस्था, इंटरप्रायजेस, अशासकीय संघटना, सोसायटी, ट्रस्ट, उत्पादक, पुरवठा, वितरण व विक्री यासह वाणिज्य, व्यायसायिक, शैक्षणिक, करमणूक, औदयोगिक, आरोग्य सेवा किंवा वित्तीय युनिट, सेवा पुरवठादार, रुग्णालये, सुश्रुषालये, क्रीडा संस्था, प्रेक्षागृहे, क्रिडा संकुले इत्यादी अशा सर्व आस्थापना/कार्यालयांमध्ये **अंतर्गत समिती स्थापन होणे आवश्यक आहे.** कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ व नियम अन्वये अंतर्गत स्थापन कशी करायची याबाबतचा **शासन निर्णय दि. १९/०६/२०१४** आपले माहिती करीता या पत्रासोबत जोडत आहोत. तरी आपण आपले आस्थापनेमध्ये १० किंवा १० पेक्षा जास्त कर्मचारी असल्यास

Scanned by CamScanner

आपणांकडे अंतर्गत समिती गठीत करुन सोबतच्या विहित नमुन्यात गठीत अंतर्गत समितीची माहिती या कार्यालयांस त्वरीत सादर करावी.

कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळांस (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम, २०१३ च्या कलम २६ (१)(क) अन्वये अंतर्गत समिती स्थापन न केल्यास नियोक्त्यावर (Employer) रु. ५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार रुपये) दंडाची तरतूद आहे. त्यानंतर हि आपण वारंवार सुचना करुनही जर अंतर्गत समिती स्थापन केली नाही तर शासकीय यंत्रणा जे लागू असेल त्याप्रमाणे आपल्या कार्यालयांचे लायसन्स रद्द किंवा व्यवसाय पुढे सुरु ठेवण्यास मज्जाव करु शकते, यांची कृपया आपण नोंद घ्यावी.

तरी अधिनियमांनुसार अंतर्गत समिती गठीत करुन विहीत नमुन्यात दि. २०/०७/२०१९ पूर्वी हया कार्यालयांस सादर करण्यात यावा.

सोबत -

१. कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळांस (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम, २०१३

२. शासन निर्णय क्र. मकचौ-२०१३/प्र.क्र.६३/मकक दि. १९ जून २०१४

३. विहीत नमुना अ (अंतर्गत समिती गठन प्रपत्र)

(प्रशिण म. भोवसार )
जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी
मुंबई शहर.

**प्रत माहितीस्तव -**

१. मा. उप-आयुक्त (महिला विकास), महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे.

२. मा. विभागिय उप-आयुक्त, महिला व बाल विकास, कोकण विभाग, मुलुंड, मुंबई.

Scanned by CamScanner

### विहीत नमुना अ (अंतर्गत समिती गठन प्रपत्र)

कार्यालयांचे नाव -

कार्यालयांचा पत्ता -

कार्यालयांचा दुरध्वनी क्रमांक आणि ई-मेल -

संपर्क व्यक्तीचे नाव आणि भ्रमणध्वनी क्रमांक -

| अनु. क्र. | समितीतील धारण पद | कर्मचारी नाव | पदनाम | भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|---|---|
| | अध्यक्ष | | | | |
| | सदस्य | | | | |
| | सदस्य | | | | |
| | सदस्य | | | | |
| | सदस्य | | | | |
| | अशासकीय सदस्य | | | | |

**कार्यालय प्रमुख स्वाक्षरी व शिक्का**

**टिप :-**

*/१. सदर अंतर्गत समिती एकादा स्थापन केल्यानंतर प्रत्येक अध्यक्ष आणि सदस्यांचा कार्यकाल ३ वर्षापेक्षा अधिक नसेल.

*/२. तसेच अंतर्गत समितीचा प्रत्येक वर्षी डिसेंबर अखेर वार्षिक अहवाल अधिनियमांतील कलम २१ च्या तरतुदीनुसार तयार करुन **मा. जिल्हा अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई** - १ किंवा हया कार्यालयांस पाठवण्यात यावा.

Scanned by CamScanner